Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18849497

# महाराष्ट्रातील नगरपालिका महानगरपालिका निवडणुकांतील बिनविरोध निवड पद्धत :लोकशाहीवरील परिणाम आणि राज्य निवडणूक आयोगाची भूमिका - एक अभ्यास

प्रा.डॉ. बालासाहेब किलचे[1]

**सारांश:**

लोकशाही व्यवस्थेचा पाया निवडणूक प्रक्रियेवर अवलंबून असतो. स्थानिक स्वराज्य संस्थांतील निवडणुका या लोकसहभाग, राजकीय स्पर्धा आणि जबाबदारी निश्चित करण्याचे प्रभावी साधन मानल्या जातात. तथापि, महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुकांमध्ये अलीकडील काळात मोठ्या प्रमाणावर बिनविरोध निवडून येण्याची प्रवृत्ती दिसून येत आहे. कायदेशीरदृष्ट्या ही प्रक्रिया वैध असली तरी लोकशाही मूल्यांच्या दृष्टीने ती चिंताजनक ठरते.या संशोधन पेपरमध्ये महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुकांतील बिनविरोध निवड पद्धतीचा अभ्यास करून तिचे लोकशाहीवरील परिणाम आणि राज्य निवडणूक आयोगाची घटनात्मक व कार्यात्मक भूमिका विश्लेषित करण्यात आली आहे. हा अभ्यास दुय्यम माहितीच्या आधारे विश्लेषणात्मक पद्धतीने करण्यात आला असून, स्थानिक लोकशाही बळकट करण्यासाठी आवश्यक सुधारणांवर भर देण्यात आला आहे.

**कीवर्डस् (Keywords):** बिनविरोध निवड, महानगरपालिका निवडणुका, लोकशाही, राज्य निवडणूक आयोग, स्थानिक स्वराज्य

**प्रस्तावना:**

लोकशाही व्यवस्थेचा आत्मा म्हणजे स्वतंत्र, निष्पक्ष आणि स्पर्धात्मक निवडणूक प्रक्रियेतून लोकप्रतिनिधींची निवड करणे हा आहे. परंतु मात्र महाराष्ट्रातील अनेक नगरपालिका महानगरपालिका निवडणुकांमध्ये सत्ताधारी पक्षांकडून मोठ्या प्रमाणावर बिनविरोध निवडून येण्याचा पॅटर्न दिसून येतो. ही प्रक्रिया कायदेशीर असली, तरी तिचे लोकशाही मूल्यांवर खोल परिणाम होतात. भारतीय लोकशाही व्यवस्थेत स्थानिक स्वराज्य संस्थांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. संविधानाच्या ७३व्या व ७४व्या घटनादुरुस्तीनंतर महानगरपालिका, नगरपालिका व पंचायत संस्था या लोकशाहीचे तळागाळातील केंद्रबिंदू बनल्या आहेत.नगरपालिका महानगरपालिका निवडणुकांमधील राजकीय स्पर्धा ही शहरी

[1] सहयोगी प्राध्यापक, श्री नाथ शिक्षणशास्त्र महाविद्यालय पैठण जि. छत्रपती संभाजीनगर

लोकशाहीचे प्रतिबिंब मानली जाते. मात्र, महाराष्ट्रातील अनेक महानगरपालिकांमध्ये सत्ताधारी पक्षांकडून रणनीतीपूर्वक बिनविरोध निवड घडवून आणली जात असल्याचे चित्र दिसून येते. यामुळे निवडणूका ह्या लोकमताची प्रक्रिया न राहता औपचारिक बाब ठरत आहे.लोकशाहीत मतदानाचा अधिकार सर्वोच्च असला तरीही मतदानापूर्वीच 'बिनविरोध' निवडीच्या घटना महानगरपालिका निवडणुकीत वाढल्या आहेत. त्यामुळे बिनविरोध निवडणुकीमुळे मतदारांच्या अधिकारावरच गदा आणली जात आहे अशी चर्चा सर्वसामान्य जनतेमध्ये होताना दिसून येत आहे. त्यामुळे बिनविरोध निवडणुकीच्या हा फंडा सत्ताधाऱ्यांचा विजय आहे की लोकशाहीचा विजय आहे याची चिकित्सा करणे गरजेचे आहे.

**संशोधनाची गरज (Need of the Study):**

- नगरपालिका महानगरपालिका निवडणुकांतील वाढत्या बिनविरोध निवडींचा लोकशाहीवर होणारा परिणाम अभ्यासणासाठी.
- मतदारांच्या सहभागावर या प्रक्रियेचा होणारा परिणाम समजून घेण्यासाठी.
- राज्य निवडणूक आयोगाच्या भूमिकेचे चिकित्सक मूल्यमापन करण्यासाठी.
- स्थानिक लोकशाही सुदृढ करण्यासाठी आणि धोरणात्मक सूचना मांडण्यासाठी.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of the Study):**

सदर संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

- महाराष्ट्रातील नगरपालिका/ महानगरपालिका निवडणुकांतील बिनविरोध निवड पद्धतीचा अभ्यास करणे
- बिनविरोध निवडींचा लोकशाही मूल्यांवर होणारा परिणाम विश्लेषित करणे
- मतदारांच्या सहभाग व राजकीय जागरूकतेवर होणारे परिणाम तपासणे
- राज्य निवडणूक आयोगाची घटनात्मक व कार्यात्मक भूमिका स्पष्ट करणे
- स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकशाही बळकटीकरणासाठी सुधारणा सुचवणे

**संशोधनाची गृहीतकृत्ये / परिकल्पना (Hypotheses):**

- महाराष्ट्रातील नगरपालिका/ महानगरपालिका निवडणुकांमध्ये बिनविरोध निवडींचे प्रमाण वाढत आहे.
- बिनविरोध निवड पद्धतीमुळे मतदारांचा लोकशाही प्रक्रियेतील प्रत्यक्ष सहभाग कमी होतो.
- बिनविरोध निवडींमुळे राजकीय स्पर्धा व उत्तरदायित्व (Accountability) कमजोर होते.
- राज्य निवडणूक आयोगाची भूमिका प्रामुख्याने प्रक्रियात्मक असून ती लोकशाही संरक्षणासाठी अपुरी ठरते.

**संशोधन पद्धती (Research Methodology):**

सदर संशोधनासाठी गुणात्मक (Qualitative) व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात येऊन समकालीन राजकीय परिस्थितीवर उपलब्ध झालेल्या द्वितीय स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे.

**बिनविरोध निवड संकल्पनात्मक मांडणी:**

जेव्हा एखाद्या प्रभागात एकच वैध उमेदवार शिल्लक राहतो आणि मतदान न होता तो निवडून येतो, तेव्हा त्यास बिनविरोध निवड म्हणतात.

लोकशाहीच्या दृष्टीने बिनविरोध होणाऱ्या निवडणूकीत लोकप्रतिनिधी निवड,पर्यायी विचारांची स्पर्धा,सत्ताधाऱ्यांची जबाबदारी निश्चिती

या तिन्ही बाबी मर्यादित होतात. त्या बिनविरोध निवडणुकीच्या संकल्पनेतील टप्प्यानीय मांडणी पुढील प्रमाणे करता येईल.

- **उमेदवारी टप्प्यावरच विरोधकांना रोखणे:**

निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच सत्ताधारी पक्ष संभाव्य विरोधी उमेदवारांशी समेट / समजूत काहींना पद, कंत्राटे, आश्वासने काहींवर प्रशासकीय / चौकशीचा दबाव आणून उमेदवारीच्या टप्प्यावरच विरोधकांना रोखल्या जाते परिणामी अनेक प्रभागांत एकच उमेदवार उरतो.

- **प्रभागरचना (Delimitation) चा रणनीतीपूर्ण वापर:**

प्रभागांची रचना अशी केली जाते की सत्ताधारी पक्षाचा मतदारवर्ग एकत्र करून विरोधी मतदार विखुरले जातात त्यामुळे विरोधकांना उमेदवार देण्याचा आत्मविश्वासच राहत नाही

Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18849497

- **अपक्ष उमेदवारांचा वापर:**

सुरुवातीला अपक्ष म्हणून उमेदवारी निवडून आल्यानंतर सत्ताधारी पक्षात प्रवेश काही वेळा अपक्षांना विरोधकांविरुद्ध उभे करून मतभंग केल्या जाते परिणामी काही प्रभागांत अपक्षही माघार घेतात त्यातून निवडणूक बिनविरोध केली जाते.

- **आर्थिक व संसाधनांचा दबाव:**

निवडणूक लढवण्यासाठी लागणारा खर्च करण्याची क्षमता,संघटन, निधी,प्रशासकीय जवळीक सत्ताधाऱ्यांकडे मोठ्या प्रमाणात असतो. त्यातून विरोधकांना स्वाभाविकपणे वाटते की “लढूनही आपण जिंकू शकत नाही त्यामुळे माघार घेतली जाते.

- स्थानिक पातळीवर “सर्वसंमती”चा दिखावा“विकासासाठी एकमत”, “शहरहितासाठी राजकारण नको” स्थानिक नेते, व्यापारी, संस्था यांचा दबाव विरोध करणाऱ्याला “विकासविरोधी” ठरवले जाते

- शेवटच्या दिवशी सामूहिक माघारी उमेदवारी मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी एकाच वेळी अनेक विरोधी उमेदवार माघार घेतात प्रशासन जाहीर करते

- बिनविरोध निवड ही कायदेशीरदृष्ट्या वैध, पण लोकशाहीदृष्ट्या वादग्रस्त ठरते आहे कारण मतदारांना मतदानाचा हक्क वापरता येत नाही राजकीय स्पर्धा संपते,लोकशाहीची गुणवत्ता कमी होते.

**थोडक्यात “बिनविरोध पॅटर्न”**

**राजकीय दबाव + प्रशासकीय ताकद + आर्थिक संसाधने + स्थानिक समेट + प्रभागरचना = बिनविरोध निवड**

**महानगरपालिकेतील निवडणुकीतील बिनविरोध निवडणुकीची चर्चा:**

सध्याच्या परिस्थितीमध्ये राज्यात नगरपालिका महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चालू आहेत. या निवडणुका सत्ताधारी आणि विरोधी पक्ष या दोन्ही पक्षांच्या आघाड्या किंवा स्वतंत्र असे हे पक्ष या निवडणुकात उतरले असले तरी या निवडणुका मात्र सत्ताधारी पक्षांसाठी लॉटरी लागल्याचे दिसून येतात. कारण नगरपालिका निवडणुकीत सत्ताधारी महायुतीचा दणदणीत विजय झालेला आहे आणि त्याच आत्मविश्वासातून पुन्हा ते महानगरपालिकेची निवडणूक लढवत आहेत. नगरपालिकेच्या निवडणुकीच्या निकालानंतर सत्ताधारी पक्षांवर मोठ्या प्रमाणात ईव्हीएम बद्दल आणि मतचोरी, पैशाचे वाटप, प्रशासनाचे सहकार्य याबद्दल मोठ्या प्रमाणात

Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18849497

आरोप झाले. वास्तविक वस्तुस्थिती पाहता नगरपालिकेच्या निवडणुका या पैशाच्या जोरावर झाल्या ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही, कारण अ ब क दर्जाच्या नगरपालिकेत मतदान करण्यासाठी मतदानाचा भाव दहा हजार रुपयांपर्यंत गेला होता, ही चर्चा स्थानिक नगरपालिका निवडणुकीत मोठ्या प्रमाणात दिसली, या चर्चेकडे दुर्लक्ष करून महानगरपालिका निवडणुकीत, विरोधी पक्षाच्या उमेदवारांच्या उमेदवारी अर्जावर तांत्रिक आक्षेप घेऊन,तसेच मतदारांना पैसे वाटण्यापेक्षा विरोधी पक्षांच्या उमेदवारांनाच ब्लॅकमेलिंग करून विकत घेऊन माघार घ्यायला लावण्याचा बिनविरोधचा नवा पॅटर्न या निवडणुकीने उदयास आला आहे.

यापूर्वी राज्यात झालेल्या नगरपालिका महानगरपालिका निवडणुकांमध्ये तुरळक तुरळक ठिकाणी निवडणूका बिनविरोध झाल्याची उदाहरणे आहेत.परंतु २०२५-२६ मध्ये होऊ घातलेल्या महानगरपालिका निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीत ठाणे, कल्याण-डोंबिवली, पुणे, पिंपरी-चिंचवड, जळगाव अशा विविध महापालिकांमध्ये सत्ताधारी महायुतीचे जवळपास ७० हुन अधिक उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामुळे बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांच्या निवडींवर काही शंका कुशंका निर्माण होऊ लागलेल्या आहेत, त्यातून विरोधी पक्षांनीही हा मुद्दा उचलून धरून बिनविरोध निवडणुका कशा झाल्या याची उदाहरणे डोळ्यासमोर आणले आहेत त्यामध्ये अर्ज मागे घ्यावा म्हणून सत्ताधाऱ्यांकडून तसेच प्रशासनाकडून विरोधी पक्षांच्या उमेदवारांना धमकविल्याचे आरोपही विरोधी पक्षाकडून झाले आहेत. तर सोलापूर सारख्या ठिकाणी अर्ज मागे घेण्याच्या कारणास्तव मध्यस्थी केल्यामुळे एका राजकीय पक्षाचे कार्यकर्त्याची हत्याही करण्यात आलेली आहे.

एकंदरीतच या निवडणुकीत निष्ठावंतांना तिकीट न मिळाल्यामुळे काही पक्षातील उमेदवारांमधला नाराजीचा नाट्यमय प्रसंग ही यावेळी महाराष्ट्रातील जनतेला अनुभवता आला त्यातून कार्यकर्ते निवडणुकीची कशी तयारी करतात आणि आपल्याला तिकीट कसे मिळावे यासाठी कसे प्रयत्न करतात हे चित्र या नाराजी नाट्यातून महाराष्ट्राने पाहिले आहे.वास्तविक पाहता निवडणुका म्हटले की नेत्यांपेक्षा कार्यकर्त्यांच्या अंगात जास्त बळ येते मग या कार्यकर्त्यांच्या असलेल्या निवडणुकात अनेक कार्यकर्ते निवडणुका लढवण्यासाठी तयार असतानाही, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महत्त्वाचे पद त्यांना खुणवतात अशावेळी कार्यकर्ते अनेक दिवसापासून निवडणुकीची तयारी करतात, पण पक्षांकडून उमेदवारी मिळाल्यानंतरही हे कार्यकर्ते त्यांच्या निवडणुका बिनविरोध कशा होऊ देतात? हा सर्वसामान्य जनतेला पडलेला प्रश्न आहे.

सध्याची राजकीय परिस्थिती पाहता निवडणुका ह्या काही राजकीय पक्षांनी व्यावहारिक स्वरूपात आणल्या आहेत आणि त्यातून विरोधी पक्षाच्या उमेदवारांना वेगवेगळी आमिषे दाखवून विकत घ्यायचे, सत्तेच्या माध्यमातून त्याच्यावर राजकीय व प्रशासकीय आणि आर्थिक दबाव आणून माघार घ्यायला लावायची. आणि एखादा राजकीय कार्यकर्ता या गोष्टीला तयार नाही झाला तर त्याचा अर्ज तांत्रिक व किरकोळ कारणावरून बाद करायचा आणि हाच

फंडा वापरताना निवडणूक अधिकाऱ्याने एखाद्या उमेदवाराचा अर्ज फेटाळला तर त्याला कोर्टात जाता येणार नाही हा बदल निवडणुकीच्या कार्यप्रणालीत करून निवडणूक कशा बिनविरोध करून जिंकता येतील याचा नवीन फंडा राज्यात सत्ताधारी पक्षाने उदयास आणला आहे ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही.

ह्या गोष्टी करताना आपल्याला मिळालेल्या पदांचा गैरफायदा घेणारे राजकीय नेतेही कमी नाहीत त्यामध्ये प्रामुख्याने मुंबईत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सुद्धा निवडणूक बिनविरोध होण्यासाठी विरोधी पक्षांच्या उमेदवारांना धमकवल्याचा त्यांच्यावर आरोप आहे आणि त्या संदर्भातील व्हिडिओज समाज माध्यमांवर प्रसारित झालेले आहेत. म्हणजे एकंदरीतच बिनविरोध निवडणुकीचा फंडा पाहता राजकीय वरदहस्त आणि प्रशासकीय वरदहस्त असल्याशिवाय ह्या गोष्टी साध्य होऊ शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे.बिनविरोध निवडून आलेल्या सदस्यांची राजकीय पक्षांची सदस्य संख्या पुढील प्रमाणे आहे.

**भाजप : ४३**

कल्याण-डोंबिवली १४, भिवंडी ६, पनवेल ६, जळगाव ६, धुळे ४, पुणे २, पिंपरी-चिंचवड २, अहिल्यानगर ३,

**शिवसेना शिंदे : १९**

ठाणे ७, कल्याण-डोंबिवली ६, जळगाव ६

**अहिल्यानगर मध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचे** दोन जण बिनविरोध निवडून आले आहेत.

उत्तर महाराष्ट्रातील चार महापालिकांमध्ये १७ जण बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामध्ये भाजपचे १०, शिवसेना शिंदे गटाचे ६ तर मालेगावमध्ये स्थानिक 'इस्लामिक पार्टी' चा एकजण बिनविरोध निवडून आला आहे.

विदर्भ आणि मराठवाडयात एकही उमेदवार चिनविरोध निवडून आलेला नाही.

एकंदरीतच बिनविरोध निवडून आलेली सदस्य संख्या पाहता महायुतीतील घटक पक्ष असलेल्या भाजप आणि शिवसेना या पक्षाची सदस्य संख्या जास्त आहे. या बिनविरोध निवडणुका कशा झाल्या आहेत यावर विरोधी पक्षाने वेगवेगळ्या पद्धतीने आरोप केलेले आहेत आता या आरोपात तथ्य किती आहेत हे ही तपासणी गरजेचे आहे तसेच बिनविरोध निवडणुकीचा फंडा या प्रकरणात निवडणूक आयोग कोणती भूमिका घेणार हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

**लोकशाहीवर होणारे परिणाम:**

- मतदारांच्या हक्कांवर मर्यादा, मतदानाचा अधिकार अस्तित्वात असला तरी प्रत्यक्ष वापर होत नाही.

- राजकीय स्पर्धेचा अभाव विरोधी पक्ष व पर्यायी विचारांना वाव राहत नाही.
- उत्तरदायित्वात घट निवडणुकीचा दबाव नसल्यामुळे लोकप्रतिनिधींची जबाबदारी कमी होते.
- स्थानिक स्वराज्य संस्थांचे दुर्बलीकरण नगरपालिका महानगरपालिका राजकीय नियंत्रणाखाली जाण्याचा धोका निर्माण होतो.
- बिनविरोध निवडणुकीच्या नावाखाली लोकशाही संपवली जात असून ती संपवण्याची सुरुवात स्थानिक पातळीवरून केली जात आहे.
- बिनविरोध निवडणुकीचा फंडा राबवल्या जात असल्यामुळे विरोधक ही निष्प्रभ झाल्याचे दिसून येत आहेत.
- विरोधी पक्ष निवडणूक आयोगाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केल्या जात असल्यामुळे निवडणूक आयोगाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आहेत?

**राज्य निवडणूक आयोगाची भूमिका:**

- निवडणूक आयोगाचे घटनात्मक स्थान पाहता भारतीय संविधानाचे कलम २४३K राज्य निवडणूक आयोगाला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे नियंत्रण व देखरेख करण्याचा अधिकार देते.
- सद्यस्थितीतील मर्यादा बिनविरोध निवड कायदेशीर असल्यामुळे हस्तक्षेपाचा अभाव राजकीय दबाव माघारी स्वेच्छेच्या आहेत का हे सिद्ध करण्यातील अडचणी यांचा सामना निवडणूक आयोगांना करावा लागतो.
- बिनविरोध निवडींचे विश्लेषणात्मक अहवाल,प्रभागरचनेत पारदर्शकता,संशयास्पद सामूहिक माघारींवर देखरेख,मतदार जनजागृती यासारख्या बाबीवर निवडणूक आयोगाने अपेक्षित अशी भूमिका घेतली पाहिजे.
- निवडणुकीतील बिनविरोध निवडून आलेल्या प्रकरणाची चौकशी करण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला आहे. त्यामुळे लोकशाहीच्या दृष्टीने निवडणूक आयोगाने घेतलेला हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आणि दूरगामी परिणाम करणारा ठरणार आहे.

Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18849497

**निष्कर्ष (Conclusion):**

महाराष्ट्रातील महानगरपालिका नगरपालिका निवडणुकांतील बिनविरोध निवड पद्धत कायदेशीर असली तरी लोकशाहीच्या आत्म्याला बाधा आणणारी आहे. ही प्रक्रिया मतदार सहभाग, राजकीय स्पर्धा आणि उत्तरदायित्व यांना कमजोर करते.राज्य निवडणूक आयोगाने केवळ प्रक्रियात्मक भूमिका न निभावता लोकशाही संरक्षक म्हणून अधिक सक्रिय भूमिका बजावणे गरजेचे आहे. कारण आज महापालिका निवडणुकीला हा बिनविरोध निवडून येण्याचा फंडा उद्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांना हाच फंडा वापरला जाईल यात शंका नाही, त्यामुळे भारतीय लोकशाहीच्या अभ्यासाकांनी वेळेच्या सजग होऊन मतदारांना जागृत करून बिनविरोध निवडणुकी मागचं राजकारण आणि अर्थकारण समजून घेऊन बिनविरोध निवडणुकीचा फंडा कुठेतरी थांबवणे गरजेचे आहे.कारण स्थानिक स्वराज्य संस्थांची आवश्यकता ही लोकशाही सुदृढ ठेवण्यासाठी असल्यामुळे निवडणुकीत होणाऱ्या या बाबींचा विचार करता निवडणूक आयोगाने कायदेशीर व संस्थात्मक सुधारणा यात करणे अत्यावश्यक आहेत.

**संदर्भसूची (References):**


- लोकसत्ता. (2026, 3 जानेवारी). दैनिक लोकसत्ता. पुणे: इंडियन एक्सप्रेस ग्रुप.
- महाराष्ट्र टाइम्स. (2026, 3 जानेवारी). दैनिक महाराष्ट्र टाइम्स. मुंबई
- सकाळ. (2026, 3 जानेवारी). दैनिक सकाळ. पुणे: सकाळ मीडिया ग्रुप.
- लोकमत. (2026, 3 जानेवारी). दैनिक लोकमत. नागपूर: लोकमत मीडिया प्रा. लि.
- देशोन्नती. (2026, 3 जानेवारी). दैनिक देशोन्नती. अकोला


**Publisher’s Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*